पुढारी

# सैन्यात भरती झालेले ३७ जवान अटकेत

## बनावट कागदपत्रे केली सादर; कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर येथील तरुणांचा समावेश

औरंगाबाद : प्रतिनिधी

सैन्यात भरती होण्यासाठी बनावट कागदपत्रे दाखल करणाऱ्या ३७ जणांना अटक करण्यात छावणी पोलिसांना अखेर यश आले आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या या उमेदवारांनी औरंगाबाद, वैजापूर, धुळे, साक्री, चाळीसगाव तहसीलचे रहिवासी प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, शाळेची कागदपत्रे, राष्ट्रीयत्वाचा दाखला बनावट सादर केल्याचे तपासात उघड झाले होते.

या प्रकरणी २३ मे २०१६ रोजी छावणी ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा नोंद करण्यात आला होता. बुधवारी त्यांना अटक करण्यात आली. गुरुवारी न्यायालयाने त्यांना ११ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. याबाबत पोलिस निरीक्षक इंदलसिंग बहुरे यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, नोव्हेंबर-डिसेंबर २०१५ मध्ये सैन्य दलातर्फे औरंगाबादेत भरती प्रक्रिया राबविण्यात आली होती. यात राज्याच्या विविध जिल्ह्यांतील तरुणांनी सहभाग नोंदविला होता. मैदानी चाचणी, वैद्यकीय चाचणी आणि लेखी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची अंतिम यादीत निवड करण्यात आली होती. त्यानंतर केवळ कागदपत्र जमा करून या उमेदवारांना सैन्यात भरती करण्यात येणार होते.

दरम्यान, उमेदवारांनी दाखल केलेल्या कागदपत्रांची छावणीतील सैन्य अधिकाऱ्यांनी तपासणी केली. यात अनेक तरुणांनी बनावट कागदपत्र जमा केल्याचा संशय अधिकाऱ्यांना आला. त्यामुळे तत्कालीन कॅप्टन मोहनपाल सिंग यांनी तत्कालीन पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांची भेट घेऊन त्यांच्याकडे प्रकरणाची सविस्तर तक्रार केली. आयुक्तांनी हे प्रकरण आर्थिक गुन्हे शाखेकडे चौकशीसाठी दिले होते. यात पोलिस उपनिरीक्षक सुभाष खंडागळे यांनी सखोल चौकशी केली.

ज्या कार्यालयाकडून संबंधित ४३ उमेदवारांनी प्रमाणपत्र मिळविले होते त्या कार्यालयाला पत्र पाठवून पडताळणी केली. त्यातून या उमेदवारांनी बोगस कागदपत्र दाखल केल्याचे उघडकीस आणले होते. यात उत्पन्न प्रमाणपत्र, शाळेची कागदपत्रे आणि रहिवासी प्रमाणपत्रांचा समावेश होता. ही कारवाई पोलिस निरीक्षक इंदलसिंग बहुरे, हेडकॉन्स्टेबल जोशी, राजू खंडागळे, अशोक नागरगोजे, बाबसाहेब साळुंके यांच्या पथकाने केली.

### बनावट स्वाक्षऱ्या, शिक्के

या उमेदवारांनी औरंगाबाद, वैजापूर, चाळीसगाव, साक्री, धुळे येथील तहसील कार्यालयाची प्रमाणपत्रे दाखल केली होती. आरोपींनी संबंधित तहसील कार्यालय, उपविभागीय अधिकाऱ्यांच्या बनावट स्वाक्षऱ्या करून तसेच शिक्के वापरून हे प्रमाणपत्र तयार केल्याचे तपासात समोर आले होते. तसा अहवालही सैन्यास देण्यात आला होता. यात अकरा जवानांनी औरंगाबाद तहसीलचे, तर अकरा जवानांनी वैजापूर तहसील कार्यालयाचे बनावट प्रमाणपत्र दाखल केले होते. उर्वरित २१ जणांनी धुळे, चाळीसगाव, साक्री येथील तहसील कार्यालयाचे बनावट प्रमाणपत्र सादर केल्याचे तपासात स्पष्ट झाले होते. त्यानंतर अंतिम यादीव निवड झालेल्या या उमेदवारांना वगळण्यात आले होते.

### अटकेतील जवानांची नावे

राहुल पांडुरंग यादव (रा. जठारवाडी, जि. कोल्हापूर), अक्षय बाळासाहेब गोसावी (रा. शितूर, जि. कोल्हापूर), विकास दिपक भोपाळे (रा. भोपाळेवाडी, जि. कोल्हापूर), रोहन सर्जेराव नाळे (रा. सांगरूल, जि. कोल्हापूर), अशुतोष अरूण कोरे (रा. पेटवडगाव शिवाजीनगर, जि. कोल्हापूर), अमित तानाजी मुळीक (रा. कासरावाडी, जि. कोल्हापूर), नामदेव शिवाजी सोळुंके (रा. वाळेखिंडी, जि. सांगली), संदेश मारोत खोत (रा. शाहुवाडी, जि. कोल्हापूर), प्रदीप तानाजी गायकवाड (रा. शेटफळे, जि. सांगली), विशाल दिलीप शिरतोडे (रा. वाझर, जि. सांगली), भारत लक्ष्मण माळी (रा. कवलापूर, जि. सांगली), सागर सावता येंगारे (रा. बेळंकी, जि. सांगली), गणेश रामदास खिल्लारे (रा. करगणी, जि. सांगली), सागर राजेंद्र सपकाळ (रा. अंबाडे, जि. सातारा), रोहित शिवाजी यादव (रा. गोपूज, जि. सातारा), शुभम अविनाश कर्पे (रा. बोरजाईवाडी, जि. सातारा), पंकज विलास घाडगे (रा. शिरमवाडी, जि. सातारा), शिवाजी रमेश औताडे (रा. पाटकळ, जि. सोलापूर), वैभव तानाजी बचनकर (रा. साके, जि. कोल्हापूर), अक्षय पवार (रा. राशीवडे, जि. कोल्हापूर), विशाल क्रिष्णात माने (रा. पिंपळगाव खुर्द, जि. कोल्हापूर), शरद अनिल यादव (रा. कोगील, जि. कोल्हापूर), प्रवीण सदाशिव पाटील (रा. सावर्डे बु., जि. कोल्हापूर), आकाश अशोक भोसले (रा. पिराचीवाडी, जि. कोल्हापूर), मनोज मारोती मांगोरे (रा. पिंपळगाव बु., जि. कोल्हापूर), धनंजय सुरेश शिंदे (रा. मुरगुड, जि. कोल्हापूर), अमोल कृष्णा गुरव (रा. कवलापूर, जि. सांगली), सर्जेराव शिवाजी नलावडे (रा. कवलापूर, जि. सांगली), चंद्रकांत केदार जाधव (रा. रसुलवाडी, जि. सांगली), महादेव अंबाजी कर्वे (रा. व्हसपेट, जि. सांगली), शैलेश विनोद कांबळे (रा. तांदूळवाडी, जि. सांगली), ऋषीकेश संभाजी पवार (रा. धावडी, जि. सातारा), अक्षय निवृत्ती बानगुडे (रा. हेळगाव, जि. सातारा), अमित महादेव लोहार (रा. चितळी, जि. सातारा), विनायक हनुमंत कुंभार (रा. चितळी, जि. सातारा), अनिकेत युवराज जाधव (रा. अतीत, जि. सातारा).

Mumbai
Page No. 04 Aug 11, 2017
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

मा. कोर्ट प्रत

(1)

S.C.R.B (एस.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म-

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

Recieved on 27-5-16
11.00 AM

1. **District** (जिल्हा)औरंगाबाद शहर **P.S.** (पोलीस कँटोनमेंट (छावणी ) **Year** (वर्ष): 2016
**FIR No.** (प्रथम खबर 0189 **System Date and Time** (प्रणाली दिनांक व वेळ): 26/05/2016 12:25 बजे
**Original Date and Time** (मूळ तारीख आणि वेळ): 26/05/2016 12:25 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम)) |
|---|---|---|
| 1 | भारतीय दंड संहिता १८६० | 420 |
| 2 | भारतीय दंड संहिता १८६० | 468 |
| 3 | भारतीय दंड संहिता १८६० | 471 |

3. **(a) Occurrence of offence** (गुन्हयाची घटना):
   1. **Day** (दिवस): दरमियानी दिन **Date From** (दिनांक पासून21/07/2015 **Date To** (दिनांक पर्यंत): 06/08/2015
   **Time Period** (कालावधी): **Time From** 00:00 बजे **Time To** (वेळेपर्यंत): 00:00 बजे
   **(b) Information received at P.S.** (माहिती मिळाल्याचे पोलीस **Date** (दिनांक ): 26/05/2016 **Time** (वेळ): 10:55 बजे
   **(c) General Diary Reference** (ठाणे दैनंदिनी संदर्भ): **Entry No.** (नोंद क्र.): 014 **Time** (वेळ): 10:55 बजे
4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): Oral
5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):
   1. **(a) Direction and distance from P.S.** (पोलीस ठाण्यापासून दिशादक्षिण, 1 किमी **Beat No.** (बिट क्र.):
   **(b) Address** सेना भरती कार्यालय छावणी,औरंगाबाद
   **(c) In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
   **Name of P.S.** (पोलीस ठाण्याचे **District(State)** (जिल्हा
6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा ):
   **(a) Name** (नाव): कर्नल मोहनपाल सिह रामपाल सिंह
   **(b) Father's/Husband's Name**(वडील / पती का नाव) :
   **(c) Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष 1967 **(d) Nationality** भारत
   **(e) UID No.** (यु.आय.डी.
   **(f) Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (अदा केल्याची
   **Place of Issue** (अदा केल्याचे ठिकाण):
   **(g) Occupation**
   **(h) Address** (पत्ता):

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सेना भरती कार्यालय छावणी,औरंगाबाद ,कँटोनमेंट (छावणी ),औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सेना भरती कार्यालय छावणी,औरंगाबाद ,कँटोनमेंट (छावणी ),औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

   **(i) Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No.(अ. | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | यादव राहुल पाडुरंग | | | 1. कोल्हापुर ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | अक्षय बाळासाहेब गोसावी | | | 1. कोल्हापुर ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 3 | विकास दिपक भोपाले | | | 1. कोल्हापुर ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

Chief Judicial Magistrate Aurangabad



Scanned with CamScanner

1. कोल्हापुर ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4 | रोहन सर्जेराव नाले | | | 1. कोल्हापुर ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 5 | उमेश अशोक डागळे | | | 1. कोल्हापुर ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 6 | अशुतोष अरुण कोरे | | | 1. कोल्हापुर ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 7 | अमित तानाजी मुरलिक | | | 1. कोल्हापुर ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 8 | नामदेव शिवाजी सोळके | | | 1. कोल्हापुर ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 9 | आदीनाथ तानाजी उबाळे | | | 1. कोल्हापुर ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 10 | संदेश मारोती खोट | | | 1. कोल्हापुर ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 11 | प्रदीप तानाजी गायकवाड | | | 1. कोल्हापुर ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 12 | विशाल दिलीप शिरोडे | | | 1. कोल्हापुर ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 13 | भरत लक्ष्ण माळी | | | 1. कोल्हापुर ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 14 | सागर सावंता यंगारे | | | 1. कोल्हापुर ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 15 | गणेश रामदास खिल्लारे | | | 1. कोल्हापुर ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 16 | सागर राजेद्र सपकाळ | | | 1. कोल्हापुर ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 17 | रोहीत शिवाजी यादव | | | 1. कोल्हापुर ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 18 | शुभम अविनाश करपे | | | 1. कोल्हापुर ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 19 | पंकज विकास घाडगे | | | 1. कोल्हापुर ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 20 | शिवाजी रमेश औताडे | | | 1. कोल्हापुर ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 21 | वैभव तानाजी बचनकर | | | 1. कोल्हापुर ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 22 | शंकर संतोष कोळी | | | 1. कोल्हापुर ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 23 | अक्षय आनंदा पवार | | | 1. कोल्हापुर ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 24 | गणेश दगडु माळी | | | 1. सांगली ,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 25 | विशाल कृष्णाद माने | | | 1. कोल्हापुर ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 26 | शरद अनिल यादव | | | 1. कोल्हापुर ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 27 | प्रविण सदाशिव पाटील | | | 1. कोल्हापुर ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 28 | आकाश अशोक भोसले | | | 1. कोल्हापुर ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 29 | मनोज मारोती मगोले | | | 1. कोल्हापुर ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 30 | धनजय सुरेश शिंदे | | | 1. कोल्हापुर ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 31 | अमोल कृष्णा गोरख | | | 1. सांगली ,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 32 | सर्जेराव शिवाजी नलावडे | | | 1. सांगली ,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 33 | चंद्रकांत केदारे यादव | | | 1. सांगली ,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 34 | माधव अबाजी करवे | | | 1. सांगली ,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 35 | शैलेश विनोद कांबळे | | | 1. सांगली ,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 36 | ऋषीकेश संभाजी पवार | | | 1. सातारा ,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 37 | किरण गंगाराम लोंढे | | | 1. अहमदनगर ,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

Scanned with CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 38 | प्रविण दगडु पवार | | | 1. सातारा ,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 39 | अनिकेत युवराज यादव | | | 1. सातारा ,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 40 | विनायक हनुमत कुभार | | | 1. सातारा ,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 41 | अमित महादेव लोहार | | | 1. सातारा ,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 42 | अक्षय निवृत्ती बानगुडे | | | 1. सातारा ,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 43 | सागर राजेंद्र चौधरी | | | 1. मध्यप्रदेश ,खडवा,मध्य प्रदेश,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ. | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य |
|---|---|---|---|---|

**10. Total value of property stolen (In Rs/-)** (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मूल्य

**11. Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

**12. First Information contents** (प्रथम खबर मजकूर):

दि. 26/05/2016

फिर्याद

मी कर्नल मोहनपाल सिंह पिता रामपाल सिंह वय49 वर्ष धंदा भारतीय सेना अधिकारी रा.सेना भरती कार्यालय छावणी औरंगाबाद फोन नंबर 02402371418मी पो. स्टे.छावणी येथे हजर येवुन फिर्याद देतो की, मी औरंगाबाद छावणी सेना भरती ऑफीस येथे भरती संचालक म्हणुन नौकरी करतो. माझ्या कडे महाराष्ट्रातील 9 जिल्हे ज्यात औरंगाबाद, बुलढाणा, धुळे, हिंगोली, जालना जळगाव, नांदेड, नंदुरबार, परभणी या जिल्ह्यांचा भरती कारभार बघतो.दि.21/07/2015 ते दि. 06/08/2015 पावेतो औरंगाबाद येथील सैन्य भरती आयोजित केली होती. त्यात लेखी परिक्षा नंतर 1050 उमेदवारांची निवड झाली होती. भरती दरम्यान प्रत्येक उमेदवारांकडुन 1) एज नशनलीटी 2) डोमेशाईन सर्टीफिकेट 3) कास्ट सर्टीफिकेट 4) रहीवाशी सर्टिफिकेट 5) शैक्षणिक कागदपत्र टि.सी. 6) अविवाहीत सर्टिफिकेट 7) वर्तणुक सर्टीफिकेट इत्यादी कागदपत्र च्या झेरक्स प्रती घेतल्या होत्या. 1050 उमेदवारांपैकी 43 उमेदवारांची डोमेशाईल प्रमाणपत्र संशयास्पद होते.करीता सदरचे प्रमाणपत्र तपासणी कामी ज़िल्हाधिकारी/ तहसिलदार यांचे कडे पाठविले होते. त्याचे अभिप्रायानुसार 43 डोमेशाईल प्रमाणपत्र बनावटी असल्याचे आढळुन आले. ते डोमेशाईल सर्टिफिकेट औरंगाबाद तहसिल चे 1) यादव राहुल पांडुरंग रा.कोल्हापुर ह.मु.औरंगाबाद 2) गोसावी अक्षय बाळासाहेब रा.सदर 3) भोपाले विकास दिपक रा.सदर 4) नाले रोहण सर्जेराव रा.सदर 5) डोंगळे उमेश आशोक रा.सदर 6) कोरे अशुतोष अरुण रा.सदर 7) मुरलीक अमित तानाजी रा.सदर 8) सोळंके नामदेव शिवाजी रा.सदर 9) उबाळे आदीनाथ तानाजी रा.सदर 10) खोट संदेश मारोती रा.सदर 11) गायकवाड प्रदीप तानाजी रा.सांगली ह.मु.औरंगाबाद 12) शिरोडे विशाल दिलीप रा. सदर 13) माळी भरत लक्ष्मण रा.सदर 14) यंगारे सागर सावंता रा.सदर 15) खिल्हारे गणेश रामदास रा.सदर 16) सपकाळ सागर राजेंद्र रा.सातारा ह.मु.औरंगाबाद 17) यादव रोहीत शिवाजी रा.सदर 18) करपे शुभम अविनाश रा.सदर 19) घाडगे पंकज विकास रा.सदर 20) औताडे शिवाजी रमेश रा.सदर यांचे डोमेशाईन प्रमाणपत्र पडताळणी साठी मा.तहसिलदार औरंगाबाद यांना दि.02/02/2016 रोजी लेखी पत्र देवुन प्रमाणपत्र पाठविले. व दि.22/03/2016 रोजी मा.तहसिलदार औरंगाबाद यांनी लेखी अभिप्राय दिला की, वरील नमुद 20 लोकांचे डोमेशाईन प्रमाणपत्र आमचे कार्यालयाकडुन दिले नसले बाबत चा अभिप्राय दिला. वैजापुर तहसिलचे 1) बचनकर वैभव तानाजी रा.कोल्हापुर ह.मु.वैजापुर 2) कोळी शंकर संतोष रा.सदर 3) पवार अक्षय आनंदा रा.सदर 4) माळी गणेश दगडु रा.सांगली ह. मु.वैजापुर 5) माने विशाल कष्णाद रा. कोल्हापुर ह.मु.वैजापुर 6) यादव शरद अनिल रा.सदर 7) पाटील प्रविण सदाशिव रा.सदर 8) भोसले आकाश अशोक रा. सदर 9) मंगोले मनोज मारोती रा.सदर 10)शिंदे धनजय सुरेश रा.सदर 11) गोरख अमोल कष्णा रा.सांगली ह.मु.वैजापुर 12) नलवाडे सर्जेराव शिवाजी रा.सदर 13) यादव चंद्रकांत केदारे रा.सदर 14) करवे माधव अंबाजी रा.सदर 15) कांबळे शैलेश विनोद रा.सदर 16) पवार ऋषीकेश संभाजी रा.सातारा ह.मु.वैजापुर 17) लोढे किरण गंगाराम रा.अहमदनगर ह.मु.वैजापुर यांना दि. 21/04/2016 रोजी प्रमाणपत्र पडताळणीसाठी पाठविले असता त्यांनी कळविले की, वरील पैकी 12 उमेदवारांचे प्रमाणपत्रा वरील शिक्का त्यांचे कार्यालयाचा नाही. तसेच दि. 21/03/2016 रोजी नुसार 4 उमेदवार त्याचे तहसिलचे मुळ निवाशी नाहीत. वरील उमेदवार यांनी बनावट प्रमाणपत्र बनविले आहेत.साक्री तहसिलचे1) पवार प्रविण दगडु रा.सातारा ह.मु.साक्री 2) यादव अिकेत युवराज रा.सदर 3) कुभार विनायक हनुमंत रा. सदर 4) लोहार अमित महादेव रा.सदर 5) बानगुडे अक्षय निवत्ती रा.सदर यांचे डोमेशाईन प्रमाणपत्र पडताळणी साठी मा.धुळे जिल्हाधिकारी यांना दि.06/03/2016 रोजी दिले असता त्यांनी दि.22/03/2016 रोजी कळविले की, डोमेशाईन प्रमाणपत्रावर आमचे कार्यालयाचा शिक्का नसुन आमचे कार्यालयाचे कुठल्याही अधिकारीची स्वाक्षरी नाही त्याचे प्रमाणपत्र बनावट आहेत. चाळीसगाव तहसिलचे 1)चौधरी सागर राजेंद्र रा.मध्य प्रदेश ह.मु.चाळीसगाव यांचे डोमेशाईन प्रमाणपत्र पडताळणी करता चाळीसगाव तहसिलदार यांना पाठविले असता त्यांनी दि.21/03/2016 रोजी लेखी अभिप्राय देवुन कळविले की, वरील उमेदवार हा आमचे तहसिलचा मुळ रहिवाशी नाहीत. यावरुन असे दिसुन येथे की वरील उमेदवारांनी कोठुनतरी बनावट अधिवास प्रमाणपत्र तयार करुन त्यावर तहसिलदार यांचे बनावट शिक्के तयार करुन सदरचे प्रमाणपत्र बनावटी तयार करुन ते खरे असल्याचे भासवुन सदरील प्रमाणपत्र सेनाभरती साठी देवुन शासनाची दिशाभुल करुन फसवणुक केली आहे. तरी त्याचे विरुध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही होणेस विनंती आहे. माझी वरील फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर मराठीत टंकलिखित केलेले असुन ती मला हिंदीमध्ये अनुवादीत करुन वाचुन दाखविली ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरीआहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे|) or

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): DINESH SAHEBRAO **Rank** (पद): SI (Sub-Inspector)
**No.(** क्र.): PNMH53973 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या



Scanned with CamScanner

or ( ज्या कारणामुळे तपास

(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव)): District

on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14. Signature/Thumb Impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

पोलीस ठाणे अमलदार

Name (नाव): CHANDRKANT LAXMAN SAVLE

पोलीस ठाणे छा णी

Rank(हुद्दा): I (Inspector)

No.(क्र.): POBN43...

औरंगाबाद - (शहर)

पी. बी. डोंडगे
सहा. फौ.

Judicial Magistr...

RCC-1128/2018
State v/s Rahul

Order passed below exh-9

Heard both the sides & perused record. It appears that the accused no 1, 2, 3, 7, 8 & 24 have filed the present appl'n u/s 239 of CRPC for discharging them from the offence leveled against them in present chargesheet. It is submitted by the petitioner accused persons that they only signed the appl'n form of their respective candidature for appearing in the examination regarding the recruitment process as per the advertisement dt 08/07/2015 published in Khandesh, ~~Aurr~~ Marathwada and Vidarbha Region. The career academy Adarsh Career Academy, where the petitioner accused was taking classes, itself has processed their appl'n. These accused are denying the charges leveled in the chargesheet u/s 420 468, 471 r/w 34 of IPC & praying for the discharge from these offences.

APP filed say & submitted that as per the FIR & the evidence on record filed with the chargesheet, the prima facie offence

is committed by the accused. At this stage one cannot scrutinize the evidence on record in absence of the proper evidence to be produced on record by both the sides. The APP relied on the citation in citation 2006 ALLMR (Cri) Sudershan Bhole V/S Jagjitsingh & AIR 1997 SC 2041.

Accused filed written notes of Argument & relied upon citations filed with notes.

I have gone through the record & & written notes. It is pertinent to note that the offence leveled against these accused are serious in nature. These accused are major persons & denying their responsibility by putting all the responsibility on the Adarsh career academy, who has allegedly submitted the compliance alongwith the submission of the candidature form of these accused for the recruitment process as per advertise dt 08/07/2015.

It is apparent from the documents filed on record with chargesheet that the alleged domicile certificates of these accused have been verified by the authority i.e District collector Dhule & given report dt 22/03/2016

In the said report dt 22/03/2016 the signatures & seals on the alleged domicile certificates of these accused were denied as not signed by any of the officers working under the said authority. So also the report of Tahasildar dt 21/03/2016 has revealed that these accused were not resident of Chalisgaon Tahasil. I have perused the statements of the witnesses & the above mentioned report.

Prima facie I am of the opinion that there is sufficient prima facie evidence against these accused to proceed further & decide the matter on merits.

The submissions of the Adv for accused regarding the age of the accused & their future prospectus of government services, as some of them have been selected for the government services, are heard & can be considered by preceeding the hearing of the case expeditiously.

Moreover in the present matter these accused are only chargesheeted & not

convicted, which order can terminate their government service.

The bonafides of the accused persons as they have submitted in the present app^ln can be put in defence & matter will be decided finally on merits, expeditiously.

In view of the reasons discussed as above I do not find merits in the submissions of these accused for the discharge of these accused from the accusation as leveled against them in present case in view of the statements of the witnesses & the documentary evidence on record. Therefore I pass the following order

ORDER

1) Application Exh 9 is rejected.
2) No order as to cost.

Vaibhav RH
05/02/24

Scanned with CamScanner

**पोलीस ठाणे छावणी औरंगाबाद**
शांतीपुरा रोड,छावणी परीसर औरंगाबाद -४३१००१.
दुरध्वनी क्र.-०२४०-२२४०५५४ फॅक्स क्र. ०२४०-२२४०५९६
Emai _ ps.cantt.abad@mahapolice.gov.in

जा.क्र. 3332/2021
पो.स्टे.छावणी
दि. 7/10/2021

प्रति,
मा. सहाय्यक पोलीस आयुक्त
छावणी विभाग, औरंगाबाद शहर

विषय- अर्जदार सतिष काशिनाथ खिलारी रा. मु.पो.करगणी ता.आटपाटी जि.सांगली यांच्या तक्रारी अर्जात अहवाल सादर केले बाबत.

संदर्भ- जा.क्र. सपोआ/ छावि/व.अ./१६७/२०२१-४७१५ दिनांक ०४/१०/२०२१ अन्वये
पो.स्टे. छावणी वरिष्ट अर्ज क्र. ३८६/२०२१ व ३१८/२०२१

रिपोर्ट- शरद ना इंगळे पोलीस निरीक्षक, पो.स्टे.छावणी औरंगाबाद शहरः

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सादर की, अर्जदार सतिष काशिनाथ खिलारे रा. मु.पो.करगणी ता.आटपाटी जि.सांगली मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयात महा सैन्य भरती घोटाळा याबाबत तक्रारी अर्ज सादर केलेला आहे सदरचा तक्रारी अर्ज आपल्या कार्यालय येथुन पो.स्टे.छावणी येथे दिनांक ०६/१०/२०२१ रोजी प्राप्त झालेला आहे. सदर प्रकरणाची वस्तुस्थिती खालील प्रमाणे.

दिनांक २६/०५/२०१६ रोजी कर्नल मोहनपालसिंह पिता रामपाल सिंह वय ४९ वर्षे धंदा सेना भरती अधिकारी यांच्या तक्रारीवरुन १) राहुल पांढुरंग यादव रा. पंढरपुर हल्ली मुःऔरंगाबाद व इतर ४१ आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला होता सदर गुन्ह्याचा तपास तत्कालीन तपास अधिकारी १) दिनेश साहेबराव सुर्यवंशी पोउपनि २) रेश्मा दस्तगीर सौदागर पोउपनि ३) सी.एल.साळवे पोलीस निरीक्षक ४) आय.एम.बहुरे पोलीस निरीक्षक ५) एम.आर.देशमुख पोलीस निरीक्षक पो.स्टे.छावणी औरंगाबाद यांनी तपास केलेला आहे. सदर गुन्ह्याच्या तपासात एकुण ३७ आरोपीला अटक करण्यात आलेली आहे त्यांच्या विरुध्द पुरावा हस्तगत झाल्याने मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी कोर्ट -०८ वे औरंगाबाद या न्यायालयात दोषारोप पत्र क्र.१२/२०१८ दिनांक १२/०२/२०१८ अन्वये दोषारोप पत्र सादर केले आहे. त्याचा खटला क्र. ११२८/२०१८ असा असुन अर्जदार यांना अर्जा मध्ये नमुद केलेले संशईत व आरोपी क्र. १) उमेश अशोक डागळे रा. मु.पो.गोटावडे ता. राधानगर जि.कोल्हापुर २) अदिनाथ तानाजी उबाळे रा. सांगरुळ ता.करवीर जि.कोल्हापुर ३) गणेश दगडु माळी रा. बहादुरवाडी ता. वालवा जि.सांगली ४) प्रदिप दगडु पवार रा. हेलगांव ता.कराड जि.सांगली ५) सागर राजेंद्र चौधरी रा. पानसलेन जि.वडवणी राज्य मध्यप्रदेश ६) श्रीमती मिरा अशोक वाघमारे रा. येरवडा पुणे ७) बाबासाहेब बापुराव पगारे रा. कुंभार बारव ता. वैजापुर जि.औरंगाबाद ८) प्रशांत बनकर रा. समता नगर ता.जि.औरंगाबाद यांच्या विरुध्द तपास चालु आहे सदर आरोपी विरुध्द सबळ पुरावा हस्तगत करुन पुरवणी दोषारोप पत्र दाखल करु अशीं टिप चार्ज नमुद केलेली आहे. भविष्यात आरोपी मिळुन येताच पुरवणी दोषारोप सादर करीत आहोत. करीता अहवाल सादर

सोबत-दोषारोप पत्राची छायांकित प्रत

सविनय सादर.
(शरद ना इंगळे)
पोलीस निरीक्षक
पो.स्टे.छावणी औरंगाबाद

महाराष्ट्र पोलीस आयुक्त
छावणी विभाग, औरंगाबाद

| | |
|---|---|
| स.पो.आ. | Arj file |
| शाखा :- | |
| आवक क्रमांक | 3577 |
| तारीख | 8 OCT 2021 |

"जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधि... अधिनि.१ २००५ नुसार देण्यात आलेली माहिती.

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

## ⚠⚠ विनंती अर्ज ⚠⚠

दि. 26/11/2021

प्ती,
मा. पोलीस आयुक्त साहेब,
औरंगाबाद शहर.

अर्जदारः
सतीश काशिनाथ खिलारी.
मु. पो. करगणी ता. आटपाडी जि. सांगली

विषयः
26/11 च्या भ्याड दहशतवादी हल्ल्यातील 'शहीद वीरपुरुषांना' श्रद्धांजली बाबत.

महोदय जी,

आपल्या शरीराला अत्यावश्यक असणाऱ्या तहान व भूक यापेक्षा अतिशय गरजेची क्रिया म्हणजे 'झोप'. देशातील जनता सुखाची- समाधानाची -शांततेची मिळणारी शांत झोप ही सीमारेषेवरील व देशांतर्गत सुरक्षेसाठी अहोरात्र जागृत असणाऱ्या सैनिक व पोलिसांच्या त्याग व देशसेवेमुळे.

सैन्य भरती वेळेस होणाऱ्या भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी मी करीत असणारे प्रयत्न पोलीस प्रशासनाच्या सहकार्याशिवाय-तुमच्या शिवाय माझ्यासाठी अशक्य आहे कारण सैन्य व्यवस्था ही देशाची संरक्षण भिंत आहे जिला भ्रष्टाचारमुळे गेलेला तडा संपूर्ण देशाला असुरक्षित बनवेल.

छावणी पोलीस ठाणे येथील प्रथम खबर अहवाल 189/ 2016 यातील आरोपीना अटक करून न्यायालयात पुढील प्रक्रियेसाठी घेऊन जाणे ही त्या ठाण्याच्या केस संदर्भातील पोलीस व पोलीस अधिकाऱ्यांची कायदेशीर जबाबदारी असल्यास यदा-कदाचित कागदपत्रे पडताळणी झाल्यास 26 मे 2016 नंतर बनावट/ खोट्या कागदपत्राने सैन्य भरती झालेल्या आपल्या राज्यातील तरुणांच्या गुन्ह्यास राज्यातील किंबहुना देशातील जनता त्या पोलिसांचा हलगर्जीपणा कारणीभूत ठरवेल.

सैन्य भरती अधिकाऱ्यांप्रमाणेच महाराष्ट्र पोलिसांना जर भ्रष्टाचारामुळेच ग्लानी आलेली असेल तर ही देशाच्या संरक्षण क्षेत्रातील अतिशय गंभीर बाब आहे....

कळावे,

26 NOV 2021
/ /20

(खिलारी सतीश काशीनाथ)

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

पोलीस ठाणे छावणी औरंगाबाद .
शांतीपुरा रोड,छावणी परीसर औरंगाबाद -४३१००१.
दुरध्वनी क्र.-०२४०-२२४०५५४ फॅक्स क्र. ०२४०-२२४०५९६
Emil :-ps.cantonment@gmail.com

स्पीड पोस्टेव्दारे

जा.क्र.४०७१/२०२१
पो. ठाणे छावणी
दि.०७/१२/२०२१

प्रति,
श्री.सतीप काशीनाथ खिल्लारी
रा.मु.पो.करगनी ता.आटपाडी जी.सांगली.मो.नं.७५१७५४९९९९

आपणास याद्वारे कळविणायत येते की, आपण दिनांक २६/११/२०२१ रोजी मा.पोलीस आयुक्त सो.पोलीस आयुक्त कार्यालय औरंगाबादशहर यांना दिलेला चौकशी अर्ज दिनांक २६/११/२०२१रोजी पोलीस आयुक्त कार्यालय येथे प्राप्त झाला असुन पुढील चौकशी कामी पोस्टे छावणी औरंगाबाद शहर येथे प्राप्त झालेला आहे. सदर प्रकरणात पोस्टे छावणी गु.र.नं.१८९/२०१६ कलम ४२०,४६८,४७१,भादवी प्रमाणे एकुण ४१ आरोपी विरुध्द गुन्हा दाखल झालेला आहे.सदर गुन्ह्यात मा.न्यायालयात दोपारोपपत्र दाखल केले आहे.सदर गुन्ह्यातील आरोपी नामे ०१)उमेश अशोक डागळे रा.मु.पोस्टे गोटावडे ता.राधानगरी जि.कोल्हापुर,०२)आदिनाथ तान्हाजी उवाळे रा. सांगरुळ ता.करवेल जि.कोल्हापुर,०३)गणेश दगडु माळी रा.वहादुर वाडी ता.वालवा जि.सांगली ४) प्रविण दगडु पवार रा.हेलगांव ता.कराड जि.सातारा.५)सागर राजेंद्र चौधरी रा.पानसलेन ता.पानसलेन जि.वडवानी राज्य मध्येप्रदेश यांच्या विरुध्द आपण अर्ज सादर केलेला आहे.

वरील गैरअर्जदार व आरोपी विरुध्द आपल्याकडे असलेले पुराव्यासह आपण पोस्टे छावणी औरंगाबाद शहर येथे दिनांक ०३/०१/२०२२ रोजी १०.०० वाजता हजर राहावे.आपल्याकडे असलेले पुरावे तपासुन व माहीती हस्तगत करुन त्यांच्या विरुध्द पुढील कार्यवाही करण्यात येईल आपण याची नोंद घ्यावी.

( शरद ना.इंगळे )
पोलीस निरीक्षक
पोलीस ठाणे छावणी औरंगाबाद

Arj file

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

🙏🙏 विनंती अर्ज🙏🙏

दि. 4 फेब्रुवारी 2022

प्रती,

माननीय श्री संजय पांडे,

पोलीस महासंचालकसो, महाराष्ट्र राज्य.

मुंबई.,

अर्जदार:

**सतीश काशिनाथ खिलारी .**

मु. पो. करगणी ता. आटपाडी जि. सांगली

पिन कोड : 415 306

email id. Satishkhilari81@gmail.com

विषय:

"**शासनाची फसवणूक** या कारणास्तव दाखल गुन्ह्यातील छावणी पोलीस स्टेशन औरंगाबाद येथील गुन्हेगारांना संबधीत पोलीस व पोलीस अधिकारी अटक करत नाहीत" या बाबत.

संदर्भ:

1. आपल्या राज्यातील **सैन्य भरती घोटाळ्याकडे** केंद्र व राज्य शासन- प्रशासन यांच्या दुर्लक्षामुळे मा. राज्यपाल सॊ, महाराष्ट्र यांचेकडे **राष्ट्रपती राजवटी** बाबत दि.23 डिसेंबर 2021 रोजी केलेला अर्ज.
2. उपरोक्त अर्जावरील कार्यवाहीबाबत दि.30 डिसेंबर 2021 चा मा. अ. अ. 2005 चा अर्ज.
3. आष्टा पोलीस ठाणे, आष्टा येथील मला आपल्या कार्यालयातून पाठविलेला **चौकशी अहवाल** व त्यानुसार मा. राज्यपालसॊ यांच्या मुळ अर्जाची पुरवणी क्र.1.

A3 4/2/2022
लिपिक
पोलीस महासंचालक कार्यालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई - ०१

Scanned with CamScanner

4. दि.25 नोव्हेंबर 2021 च्या आपल्या कार्यालयास दिलेल्या मा. अ. अ.2005 च्या अर्जाचे मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, छावणी परिसर औरंगाबाद यांनी मला कळविलेले उत्तर व त्यानुसार मा राज्यपाल सौ यांच्या मुळ अर्जाची पुरवणी क्र.2.

महोदय जी,

सुमारे दीडशे वर्षाच्या इंग्रजांच्या ताब्यातील आपल्या देशाला **स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी** स्वातंत्र्य सैनिकांनी हिंसा व अहिंसा स्वरूपात अनेक प्रयत्न केलेले असून त्यांनी कष्टातून- त्यागातून बनविलेले काचेच्या भांड्यासारख्या आपल्या देशाची निगा व सौंदर्य राखणे, ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. देशांतर्गत व सीमा सुरक्षेतील भ्रष्टाचार हा दिर्घ काळापासून **विकसनशील** स्वरूपात असलेला आपला देश **विकसित** होण्याऐवजी **अविकसित** बनवेल.

मी भारतीय सैन्य भरती व्यवस्थेवर करीत असणारे **गंभीर आरोप** खरे ठरण्यासाठी 26 मे 2016 च्या छावणी पोलीस ठाणे, औरंगाबाद येथील 0189/2016 या दाखल गुन्ह्याचा न्यायालयीन निकाल गरजेचा आहे व त्याकरिताच त्यातील उर्वरित संशयित गुन्हेगारांना **अटक करण्याची 'कारवाई' होण्याकरिता** मी पाठपुरावे करीत आहे.

**देशाच्या 'कायदा व सुरक्षेच्या' प्रतिमेविषयी संपूर्ण जगाची भावना/ विचार** या गंभीर विषयाचे महत्व जाणून **आपण उपरोक्त आरोपींच्या अटकेची कारवाई** कराल, याची आशा बाळगतो.

कळावे,

आपला विश्वासू.

Scanned with CamScanner

सहाय्यक पोलीस आयुक्त, कार्यालय छावणी विभाग,
**औरंगाबाद शहर.**
दुरध्वनी क्रमांक ०२४०-२२४०५८७.
Email ID- acpcantt.abad@mahapolice.gov.in

जा.क्र.सपोआ./छा.वि./मा.अधि./अ.क्र-२४६/२०२२- 49 औरंगाबाद, दि. /०१/२०२२.

प्रति,
श्री. सतीश काशिनाथ खिल्लारी,
रा. मु.पो.करगणी, ता. आटपाडी,
जि.सांगली.

संदर्भ :- माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत आपला दिनांक २५/११/२०२१ रोजीचा अर्ज.
विषय :- माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार नियम (३) प्रमाणे माहिती पुरविण्या बाबत.

------ooooo------

उपरोक्त संदर्भ व विषयान्वये आपणास कळविण्यांत येते की, आपला माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गतचा अर्ज हा दिनांक १५/१२/२०२१ रोजी इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

उपरोक्त विषयान्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ पोट कलम (त्र) मधील तरतुदीनुसार जी माहिती देणे याचे बंधन माहिती अधिकारी यांचेवर नाही अशी आणि लोकहिताचे दृष्टीने व्यापक जनहीत साध्य न करणारी किंवा विशेष त्रयस्त पक्षाबरोबर उदभवणा-या वैयक्तीक वादाच्या अनुषंगाने आपण मागितलेली माहिती नाकारण्यात येत आहे.

आपण या उत्तराने/माहितीने व्यथित झाल्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (१) मधील तरतुदी नुसार सदरचे पत्र प्राप्त झाल्याचे तारखे पासुन ३० दिवसाचे आत प्रथम अपिलीय अधिकारी, तथा पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१, पैठण गेट, औरंगाबाद शहर, यांचेकडे प्रथम अपिल अर्ज करण्यास आपणास मुभा आहे.

**( विवेक सराफ )**
जन माहिती अधिकारी
तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
छावणी विभाग औरंगाबाद शहर.

प्रत सविनय सादर :-
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -१, तथा प्रथम अपिलीय अधिकारी, औरंगाबाद शहर.



Scanned with CamScanner

1:55

RTI Inbox

ACP (CANTT) Mah... 1:03 PM
to me

From ACP (CANTT) Mahapolice • acpcantt.abad@mahapolice.gov.in
To satishkhilari81@gmail.com
Date Feb 26, 2022, 1:03 PM
Standard encryption (TLS).
View security details

ACP Cantonment

see the attachment

Azadi Ka Amrit Mahotsav

संदर्भ :- माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत आपला दिनांक ३०/१२/२०२१ रोजीचा अर्ज.
विषय :- माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार नियम (३) प्रमाणे माहिती पुरविण्या बाबत.

------ooooo------

उपरोक्त संदर्भ व विषयान्वये आपणास कळविण्यांत येते की, आपला

Scanned with CamScanner

सहाय्यक पोलीस आयुक्त, कार्यालय छावणी विभाग,
औरंगाबाद शहर.
दुरध्वनी क्रमांक ०२४०-२२४०५८७.
Email ID- acpcantt.abad@mahapolice.gov.in

जा.क्र.सपोआ./छा.वि./मा.अधि./अ.क्र-१४/२०२२- ७८९ औरंगाबाद, दि. २५/०२/२०२२.

प्रति,

श्री. सतीश काशिनाथ खिल्लारी,
रा. मु.पो.करगणी, ता. आटपाडी,
जि.सांगली.

संदर्भ :- माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत आपला दिनांक ३०/१२/२०२१ रोजीचा अर्ज.
विषय :- माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार नियम (३) प्रमाणे माहिती पुरविण्या बावत.

------ooooo------

उपरोक्त संदर्भ व विषयान्वये आपणास कळविण्यांत येते की, आपला माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गतचा अर्ज हा दिनांक १९/०१/२०२२ रोजी इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

उपरोक्त विषयान्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ पोट कलम (त्र) मधील तरतुदीनुसार जी माहिती देणे याचे बंधन माहिती अधिकारी यांचेवर नाही अशी आणि लोकहिताचे दृष्टीने व्यापक जनहीत साध्य न करणारी किंवा विशेष त्रयस्त पक्षाबरोबर उदभवणा-या वैयक्तीक वादाच्या अनुषंगाने आपण मागितलेली माहिती नाकारण्यात येत आहे.

आपण या उत्तराने/माहितीने व्यथित झाल्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (१) मधील तरतुदी नुसार सदरचे पत्र प्राप्त झाल्याचे तारखे पासुन ३० दिवसाचे आत प्रथम अपिलीय अधिकारी, तथा पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१, पैठण गेट, औरंगाबाद शहर, यांचेकडे प्रथम अपिल अर्ज करण्यास आपणास मुभा आहे.

(विवेक सराफ)
जन माहिती अधिकारी
तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
छावणी विभाग औरंगाबाद शहर.

प्रत सविनय सादर :-

मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -१, तथा प्रथम अपिलीय अधिकारी, औरंगाबाद शहर.

Scanned with CamScanner